आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ एप्रिल २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- भारताचं ग्रीन आशा हे नववं इंधनवाहू जहाज होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून रवाना
- राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी
- बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल
- चारचाकी वाहन विक्रीत गेल्या आर्थिक वर्षात १३ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ

**आणि**

- इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर आज केलेल्या हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

ग्रीन आशा या एलपीजी टँकर घेऊन येणाऱ्या जहाजाने होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली आहे. आखातात सुरु झालेल्या संघर्षानंतर ही सामुद्रधुनी पार करुन भारतात येणारं हे नववं जहाज आहे. ४६ हजार ६५० मेट्रिक टन इंधन घेऊन आलेल्या ग्रीन सान्वी या टँकरनेही प्रवास पूर्ण केला आहे. या भागातून भारतीय जहाजांची वाहतूक सुरु आहे. BW TYR, BW ELM, पाईन गॅस आणि जग वसंत अशा जहाजांनी एकत्रितपणे ९२ हजार टन LPG वाहून आणला तर जग लाडकी आणि जग प्रकाश या जहाजांनी संयुक्त अरब अमिराती आणि ओमानमधून कच्चं तेल आणि गॅसोलीन आणलं आहे.

**<><><><><>**

राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, ज्योती वाघमारे, माया इवनाते, रामराव वडकुते या महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या

सदस्यांचा त्यात समावेश आहे. राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी सदस्यांना  शपथ दिली.

**<><><><>**

पुदुचेरी, आसाम आणि केरळ विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराकरता सर्व राजकीय पक्षांची यंत्रणा वेगाने काम करत आहे. सर्वच पक्षांच्या स्टार प्रचारकांच्या सभा आणि रोड शो होत आहेत. भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधे बारपेटा इथं प्रचारसभा घेतली. भाजपा दूरदृष्टीनं विकसित आसाम - विकसित भारत या उद्दिष्टानं काम करत  असल्याचं त्यांनी भाषणात सांगितलं.

**<><><><>**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज उमेदवारी अर्ज भरला. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी कोणत्याही पक्षाच्या उमेदवारांनी आपले अर्ज दाखल करु नयेत अशी विनंती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आमदार रोहित पवार यानी केली आहे. बारामती मधे पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होत आहे.  माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एफआयआर दाखल केला तर बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेतला जाऊ शकतो. असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीनं आज स्पष्ट केलं.  काँग्रेसनं बारामतीतून प्रदेश सचिव आकाश मोरे यांना उमेदवारी दिली आहे. दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं देखील निवडणूक बिनविरोध होण्यासाठी पाठिंबा दिला आहे.

**<><><><>**

अहमदनगर जिल्ह्यातल्या राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होत आहे. आज अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असून आतापर्यंत ४ उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. या पोटनिवडणुकीसाठी आतापर्यंत ४३ अर्जांची विक्री झाली आहे. भारतीय जनता पक्षानं शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली असून महाविकास आघाडीच्या वतीने अद्याप उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आलेली नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी आणि एमआयएमनं उमेदवार न देण्याचा निर्णय घेतल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

भाजपाच्या ४७ व्या स्थापना दिनानिमित्त प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी भाजपा कार्यकर्त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. भाजपा अध्यक्ष नितीन नबीन यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात पक्षध्वजारोहण झालं. राज्यातल्या भाजपा कार्यालयांमधेही स्थापनादिनानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

भाजपा मुस्लिमविरोधी असल्याचा दावा पूर्णपणे असत्य असल्याचं भाजपाचे ज्येष्ठ नेते नितान गडकरी यांनी म्हटलं आहे. भाजपा कोणत्याही धर्माविरोधात नाही, देशाच्या परंपरा आणि सर्वांचं कल्याण होवो, या धारणेवर भाजपाचा विश्वास असल्याचं ते म्हणाले. नागपूरमधे भाजपाच्या स्थापनादिन सोहळ्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. भारतीय जनता पक्षाच्या स्थापनेपासूनचा प्रवास हा संघर्षमय राहिला आहे. अनेक अडचणींवर मात करत पक्षाने आज देशात मजबूत स्थान निर्माण केले आहे. देशाला “विश्वगुरू” बनवणे आणि समाजात शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवणे हेच भाजपचं मुख्य ध्येय असल्याचं ते म्हणाले.

पक्षासाठी आयुष्य वेचलेल्या लाखो कार्यकर्त्यांचे त्यांनी आभार मानले. शून्यातून पक्ष उभा करणाऱ्या आणि आज आपल्यात नसलेल्या कार्यकर्त्यांच्या योगदानाचे स्मरण करत गडकरी यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

<><><><>

गेल्या आर्थिक वर्षात  देशाल्या चारचाकी  वाहन विक्रीत  १३ पूर्णांक ३ दशांश टक्के वाढ झाली आहे. या वर्षी २ कोटी ९६ लाख ७१ हजार चारचाकी गाड्यांची झाल्याचं फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशनने म्हटलं आहे. दुचाकी गाड्यांच्या विक्रीने कोविड काळानंतर पुन्हा उच्चांक गाठला असून गेल्या आर्थिक वर्षात २ कोटी १४ लाख इतक्या दुचाकी विकल्या गेल्या आहेत. ही वाढ १३ पूर्णांक ४ दशांश टक्के इतकी आहे. ट्रॅक्टर विक्रीतही १८ पूर्णांक ९५ शतांश टक्के इतकी वाढ झाली असून गेल्या आर्थिक वर्षात सुमारे १० लाख पेक्षा जास्त ट्रॅक्टर विकले गेले.

<><><><>

इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर आज केलेल्या हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू झाला. डोनाल्ड ट्रंप यांनी होर्मुजची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेली मुदत संपत आली असतानाच तेहरानमध्ये जोरदार स्फोट झाले. इराणने आपल्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यास इराणची उर्जा संयत्र, पूल यांच्यावर हल्ले होतील असं ट्रंप यांनी म्हटलं आहे. दरम्यान, इराणचे निवासी भाग लक्ष्य केले गेले तर अधिक जोरदार प्रत्युत्तर दिलं जाईल असा प्रतिइशारा इराणनं दिला आहे.

<><><><>

एअर इंडियाने इस्रायलला जाणाऱ्या विमानसेवा रद्द केल्या आहेत. तेल अविवला जाणारी विमान उड्डाणं येत्या  ३१ मे पर्यंत स्थगित केल्याची माहिती एअर इंडियाच्या अधिकाऱ्यांनी दिली. काही इस्रायली कंपन्या वगळता इतर सर्व

कंपन्यांनी तेल अवीवकडे जाणाऱ्या विमानसेवा स्थगित केल्या आहेत. इस्रायलमध्ये कामकाजानिमित्ताने वास्तव्याला असणारे ४० हजार भारतीय यामुळे इस्रायलमध्ये अडकून पडले आहेत. तेल अविवमधील भारतीय दूतावास त्यांच्या संपर्कात आहे. दरम्यान, एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या दोन्ही कंपन्यांची मिळून पश्चिम आशियातली जवळपास तीस प्रवासी विमानं आज आखाती देशातून वाहतूक करतील.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने पीएनजी पुरवठ्यावर भर दिला आहे. नागपूर जिल्ह्यातही प्रथमच बुटीबोरी औद्योगिक परिसरात येत्या १० एप्रिलपासून पीएनजी पुरवठा सुरू केला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात १०० कुटुंबांना पीएनजी पुरवठा सुरू केला जाईल. त्यानंतर जामठा, मिहान, हिंगणा, वानाडोंगरी आणि वाडी परिसरात टप्प्या-टप्प्याने या प्रकल्पाचा विस्तार केला जाणार आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणार आहे. कोलकात्यात ईडन गार्डन मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

**//<><><><><>//**